# गोवा शिपयार्डतर्फे दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त वक्तृत्व स्पर्धा




**सांकवाळ : दक्षता जागृती सप्ताह कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना प्रा. अंशुमन सरकार. सोबत लोचन कारेकर, माया चोपडेकर, प्रा. सुकांता मोंडल व सेबेस्तियाव फर्नांडिस.**

प्रतिनिधी
वास्को

गोवा शिपयार्डच्या दक्षता विभागातर्फे सांकवाळ येथील बिटस् पिलानी कॅम्पसच्या सहकार्याने शुक्रवारी बिटस् पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसमध्ये आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत बिटस् पिलानी गोवा कॅम्पस, कार्मेल कॉलेज फॉर वुमन, डॉन बॉस्को कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, गोवा इंजिनीअरींग कॉलेज, सरकारी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय खांडोळा, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी गोवा) व एमईस महाविद्यालय यांनी स्पर्धेत भाग घेतला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बिटस् पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसचे असोसिएट डीन प्रा. अंशुमन सरकार उपस्थित होते. त्यांच्याचहस्ते दीप प्रज्वलीत करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

याप्रसंगी प्रा. सुकांता मोंडल, गोवा शिपयार्डचे दक्षता विभाग प्रमुख सेबेस्तियाव फर्नांडिस, लोचन कारेकर व माया चोपडेकर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे प्रा. अंशुमन सरकार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोचन कारेकर यांनी केले तर सेबेस्तियाव फर्नांडिस यांनी आभार मानले.